निशाणी क्र.

**<u>फिर्यादीचा दोषारोपापूर्वीचा पुरावा-</u>**

**माझे नाव**- शुभम मंगेश गोसावी

**वय**- २७ वर्षे **धंदा-** नोकरी

**राहणार -** पणदुर, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग.

**<u>फियार्दीतर्फे विधिज्ञ श्री. आर. डी. बिले यांचेमार्फत सरतपास शपथेवर सुरु -</u>**

१. पणदुर गावी माझ्या आजोबांच्या जमीनी असून काजूची बाग आहे. जमिनीचा सर्व्हे नं. ८१ अ/१ अ/ १ ब/ १ क/ ६/ १ अ असा आहे. सदर मिळकतींकडे आरोपींचा काहीही संबंध नाही. दि.११.०१.२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास मी व माझे आजोबा भगवान तुकाराम गोसावी काजूच्या बागेमध्ये साफसफाईचे काम करत होतो. त्यावेळी आनंद कृष्णा भोगले हे जे.सी.बी. घेवून आले, आणि त्यांनी आमच्या काजूच्या बागेचे कुंपण तोडून जे.सी.बी. कुंपणात घातला. मी त्यांना 'हे तुम्ही काय करत आहात?' अशी विचारणा केली असता त्यांनी मला 'तु माझे काय तोडणार आहेस, मी आता तुझी झाडे तोडतो, रांडेच्या' अशी शिवीगाळ केली व जे.सी.बी. काजुच्या झाडावर घातला. तो अडविण्यासाठी मी मध्ये गेलो. त्याने माझ्या अंगावरती जे.सी.बी घातला. मी पडलो. माझ्या पायाला जखम झाली. हे बघून आजोबा मध्ये आले. त्यांनी आजोबांना ढकलले. आणि 'म्हाताऱ्या मी आता तुला जिवंत ठेवणार नाही' अशी जिवे मारण्याची धमकी दिली, आणि २० काजुची झाडे तोडली व ८०,०००/- रुपयांचे नुकसान केले. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला गेलो. पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेतला. मला वैद्यकिय तपासणीसाठी कुडाळ उपजिल्हा रुग्णालयामध्ये पाठविले. त्यानंतरची मी प्रस्तुतची केस दाखल केली. पोलिसांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. मी प्रस्तुतकामी एन.सी. ची छायांकित प्रत दाखल केली आहे. ती मला दाखविलेस मी ती ओळखू शकतो. साक्षीदारास

**निशाणी क्र.**

निशाणी ३/१ कडील कागद दाखविणेत आला. साक्षीदार सांगतो की तो तोच आहे.

सरतपास पूर्ण.

**सदरचा पुरावा हा दोषारोपापूर्वीचा असल्याने उलटतपास पुढे ढकलणेत येतो.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

कुडाळ (आर.जी.कुंभार )

दिनांक -०१.११.२०२५ अति. न्यायदंडाधिकारी वर्ग-१, कुडाळ